मुंबई विद्यापीठ
विद्यार्थी कल्याण विभाग


क्र.वि.क/29/२०१४


डॉ. मृदुल निळे
प्र.संचालक

विद्यापीठ विद्यार्थी भवन
'बी' रोड, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०


**परिपत्रक :**

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय आणि अशासकीय, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थांचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, डॉ.पंजाबराव देशमुख आयएएस अकादमी, अमरावती यांचे मार्फत विद्यापीठात तसेच विद्यापीठाच्या कक्षेत येणा-या महाविद्यालयात शिक्षण घेणा-या विद्यार्थिनींसाठी 'विद्यार्थिनींनो निर्भय व्हा' या विषयावर कार्यशाळा घेण्याचे ठरविले आहे.

त्यानुसार आपणास विनंती करण्यात येते की, डॉ.पंजाबराव देशमुख आयएएस अकादमी, अमरावती यांच्या विनंतीनुसार योग्य ती पुढील कार्यवाही आपल्या स्तरावर करण्यात यावी, व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सदर कार्यालयास तात्काळ सादर करावा.

प्रत संलग्न : डॉ.पंजाबराव देशमुख आयएएस अकादमी, अमरावती यांचे, दिनांक २९ जुलै, २०१४ चे पत्र.

for 25.8.14
(डॉ.मृदुल निळे)
संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग

दिनांक : २५ ऑगस्ट, २०१४.

प्रति,

विद्यापीठाशी संलग्नित सर्व अशासकीय आणि शासकीय अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन आणि स्थापत्यशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थांचे अध्यक्ष/सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहितीसाठी रवाना :
मा.संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख आयएएस अकादमी, अमरावती.

*****************

REG|ICD|2014-15|412


# मिशन IAS

## डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकादमी, अमरावती

जिजाऊ नगर, महापौरांच्या बंगल्यासमोर, विद्यापीठ रोड, कॅम्प अमरावती

Mob. ९८९०९९६७००३

Email. iasmission@gmail.com, web site : www.iasmission.com,

facebook - Nareshchandra kathole


---

प्रति, २९.०७.२०१४

मा. कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**विषय :- आपल्या विद्यापीठातील विविध महाविद्यालयात विद्यार्थिनींनो निर्भय व्हा या कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत.**

**संदर्भ :- महिला सक्षमीकरण**

DEPARTMENT OF STUDENTS' WELFARE
Inward No. 811
05-8-14
UNIVERSITY OF MUMBAI

Sneha
Circular
6760
6.8.14

महोदय,

डॉ. पंजाबराव देशमुख IAS अकादमी ही महाराष्ट्रातील प्रतिष्ठित संस्था आहे. **या संस्थेच्या उपक्रमात आतापर्यंत १२ विद्यापीठांचे कुलगुरू व १५४ IAS, सनदी व राजपत्रित अधिकारी सहभागी झालेले आहेत. महाराष्ट्राचे मा. मुख्य सचिव व महाराष्ट्राच्या वित्त आयोगाचे अध्यक्ष श्री. जे. पी. डांगेसाहेब या संस्थेच्या उपक्रमात १० वेळा सहभागी झालेले आहेत.**

आमच्या संस्थेने आतापर्यंत संपूर्ण भारतात **५००० कार्यशाळा** विविध विषयांवर घेतलेल्या आहेत. या शैक्षणिक वर्षात महिला सक्षमीकरणासाठी आम्ही **विद्यार्थिनींनो निर्भय व्हा** या विषयावर विविध विद्यापीठात तसेच विद्यापीठाच्या कक्षेत येणाऱ्या महाविद्यालयात कार्यशाळा घेण्याचे ठरविले आहे. **त्यासाठी आमची संस्था मानधन घेणार नाही.**

आमच्या संस्थेचे संचालक तसेच इतर तज्ञ मार्गदर्शक येऊन ही कार्यशाळा घेतील. विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास वाढावा व त्यांनी समर्थपणे जीवनातील आव्हानांना सामोरे जावे हा या मागचा उद्देश आहे.

आपणास विनंती आहे की, आपल्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या विविध महाविद्यालयातील प्राचार्यांना या उपक्रमाची माहिती देऊन त्यांना त्यांच्या महाविद्यालयात विद्यार्थिनींनो निर्भय व्हा या विषयावर कार्यशाळा घेण्याची सूचना करावी. त्यासाठी आमच्या संस्थेचे संचालक व इतर तज्ञ मार्गदर्शक त्या त्या महाविद्यालयात जातील. विशेष म्हणजे त्यासाठी मानधन घेण्यात येणार नाही. तरी आपण या संदर्भात एक परीपत्रक काढून उपकृत करावे ही विनंती.

आपल्या सहकार्याबद्दल आभारी आहे.

कळावे. धन्यवाद.

आपला विश्वासू

[signature]

**प्रा.डॉ. नरेशचंद्र काठोळे**
**संचालक,**
**डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकादमी,**
**अमरावती.**

DSW. for N.A

R
30/07/14